**प्रेसनोट दिनांक २८/०९/२०१८**

## “दांडेकर पुलावरील पुर परिस्थितीमध्ये पोलीसांनी दाखवले अतुलनीय धैर्य”

## “कर्तव्यो परमो धर्म” याचा नागरीकांना आला प्रत्यय”

## महिला पोलीस कर्मचारी निलम भारत गायकवाड यांची उल्लेखनीय कामगिरी

## दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर

---

दिनांक २७/०९/२०१८ रोजी सकाळी ११.०० वा.चे सुमारास खडकवासला धरणातुन इंदापुरकडे कालव्याद्वारे जनता वसाहत परिसरातुन पाणी जाते त्या पाण्याची उत्तरेकडील संरक्षण भिंत्त अचानकपणे फुटल्याने त्यातील पाणी दांडेकर पुल व परिसरात वसलेल्या स.नं. १३०,१३१,१३२,१३३ व २१४ येथील झोपडपट्टीमध्ये पसरले तसेच लाल बाहाद्दुर शास्त्री रोड कडुन येणारी वाहतुक व स्वारगेट कडुन वडगांव धायरी कडे जाणारी वाहतुक ही मांगीर बाबा चौक ते पानमळा वसाहत व निलायम पुल ते दांडेकर पुल या परीसरात अडकुन राहीली या वेळेस सर्व प्रथम दत्तवाडी पोलीस स्टेशन कडील सर्व पोलीस चौकीचे अधिकारी कर्मचारी यांना स्थानिक नागरीकांना पाण्यातुन बाहेर काढणे वाहतुक सुरळीत करणे व मदत कार्यात अडचण येऊ नये या करीता मांगीर बाबा चौक ते निलायम पुल,पानमळा वसाहत येथील वाहतुक थांबविण्यात आली होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक,देविदास घेवारे, पोलीस निरीक्षक,गुन्हे कृष्णा इंदलकर यांनी ज्या ज्या ठिकाणी नागरीक पाण्यामध्ये अडकुन राहीले आहेत. त्या नागकरीकांना बाहेर काढण्या साठी दोर लावुन पोलीस व स्थानिक नागरीक यांच्या मदतीने नागरीकांना सुरक्षित बाहेर काढले परिसरातील विज पुरवठा तातडीने बंद करुन घेतला. महानगरपालिकेच्या फायर ब्रिगेडच्या गाडया त्या ठिकाणी बचाव कार्य चालु केले.

सर्व्हे नं.१३३ विश्वकर्मा गॅरेज शेजारी वसाहतीत खोलगट भागात वसलेली असल्याने तेथे पाण्याचा वाहण्याचा ओघ जास्त होता. अनेक महिला व लहान मुले अचानक आलेल्या पाण्यामुळे घरामध्ये अडकुन होते. अशा वेळेस दत्तवाडी पोलीस स्टेशन येथील **महिला कर्मचारी निलम भारत गायकवाड व पोलीस कॉन्स्टेबल संतोष लक्ष्मण सुर्यवंशी** यांनी मुख्य रस्त्यापासुन १०० मीटर आत खोलगट भागातील वसाहती मध्ये आत जाऊन लहान मुलांना बाहेर काढले. **मपोशि.निलम गायकवाड यांनी पाण्याचा वाढणारा ओघ व त्यामुळे बचाव कार्यात येणारी अडचण याचेवर उपाय म्हणुन एका उभ्या असलेल्या टेम्पो मधुन नॉयलॉनची दोरी घेऊन ती दोरी अपुर्ण आहे हे समजल्यावर तेथील टायर पंक्चरच्या दुकानातुन हवा भरलेली मोठी टायरची टयुब बाहेर घेऊन त्या टयुबला दोरी बांधुन स्वतः कमरे इतक्या पाण्यातुन जाऊन लहान मुलांना बसवुन बाहेर आणले, व त्यानंतर नॉयलॉनची दोरी एका खांबाला बांधुन त्या दोरीच्या सहाय्याने महिला व पुरुषांना बाहेर आणले, व स्वतः आपल्या पाठीवर लहान मुलांना घेऊन सुरक्षित ठिकाणी पोहचविले आहे.**

तसेच पोलीस कॉन्स्टेबल संतोष सुर्यवंशी यांनी सर्व्हे नं.१३२ मधील झोपडपट्टीमध्ये नागरीकांना सुरक्षित बाहेर काढत असतांना एक महीला त्यांचेकडे जोर जोरात रडत आली व तिने सांगितले की, माझ्या एक महिन्यांचे बाळ घरामध्ये आहे, त्याच वेळेस दुस�या महिलेले माझ्या ११ महिन्यांचे बाळ घरात आहे, त्याला बाहेर काढा असे म्हणुन दोघीही रडुन गोंधळ करु लागल्या तेव्हा त्यांचे सोबत महिला पोलीस कॉन्स्टेबल गायकवाड या होत्या तेव्हा सुर्यवंशी यांनी सांगितले की,**आपण काय पण करुन आत गेले पाहिजे.** तेव्हा ते दोघे पाण्यातुन रस्ता काढत आत जात असतांना पाण्याचा प्रवाह जोरात होता त्या प्रवाहा बरोबर दोघेही वाहुन जाण्याची शक्यता होती, त्यामुळे त्यांना आत जाता येत नव्हते तेवढयात आग्नीशामक दलाचे जवान तेथे आले असता त्यांच्या कडुन दोर घेवुन पोलीस कॉन्स्टेबल संतोष सुर्यवंशी व आग्नीशामक दलाचे २ कर्मचारी तात्काळ तेथील एका भिंतीवरुन दोर टाकुन त्यांचा आधार घेवुन खाली उतरुन तेथील एका ११ महिन्याचे बाळाला घेवुन भिंतीवर थांबलेल्या लोंकाच्या ताब्यात दिले. त्यानंतर आणखी एका घरातील १ महिन्याचे बाळाचा शोध घेत असताना तेथील नागरीकांना बाहेर काढले. त्यानंतर १ महिन्याचे बाळाला बाहेर काढले.

या सर्व झालेल्या घटनेत वरिष्ठ पो.निरी.देविदास घेवारे यांच्या नेतृत्वाखाली पो. निरी.गुन्हे,कृष्णा इंदलकर,सहा.पो.निरी.सुरेंद्र धुमाळे,सहा.पो.निरी.शंकर सलगर,पो. उप.निरी.मनोज अभंग,पो.उप.निरी.अनिल डफळ,पो.उप.निरी.मंगेश साळवे,पो. उप.निरी. विकास जाधव, पो.उप.निरी.कुलदीप संकपाळ, पो.उप.निरी.अश्रुदेव पवार, **पो.उप.निरी. प्रणिता भाकरे, पो.उप.निरी.रुपाली कुलथे**, सहा.पो.फौज.मारुती चव्हाण सहा.पो.फौज. भरत यमगर, पो.हवा.पांडुरंग जगताप, **पो.शि.संतोष सुर्यवंशी**, शिवाजी शिंदे, इरफान तडवी, रामु ढवळे, गणेश शिंदे, विशाल ठोंबरे, कैलास खवले, विकास पांडोळे, विशाल साळुंखे, अशोक वाघुले, अजिनाथ देवकर, अमोल लोहार, प्रविण पिसाळ, नितीन केरीपाळे, शिवाजी क्षिरसागर, सुजीत अहीवळे, चेतन गद्रे, अक्षय वाबळे, प्रमोद भोसले, दया कांबळे, राहुल आवारी, महेश गिरी, शरद राऊत, राहुल ओलेकर, पो.ना. सोमेश्वर यादव, **म.पो.शि.निलम गायकवाड**, माधवी पवार, व दत्तवाडी पोलीस स्टेशन कडील इतर कर्मचारी यांनी उत्कृष्टपणे घटना घडली ठिकाणी कायदा व सुव्यस्था संभाळलेली आहे.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.





